# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबई महानगरपालिकेमध्ये संरक्षण दलातील माजी सैनिकांना मूळ वेतन मिळण्याबाबत**

**(१) १९४१७ (११-०८-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेमध्ये कामाला असणाऱ्या संरक्षण दलातील ४५ माजी सैनिक मूळ वेतनाचा प्रश्न सोडविण्यासाठी चार वर्षापासून वारंवार मुंबई महानगरपालिका प्रशासनाशी पत्र व्यवहार करून देखील प्रशासन दखल घेत नसल्याचे भारतीय माजी सैनिक संघटनेने आरोप केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माजी सैनिकांनी आयुक्तांशी वारंवार पत्र व्यवहार केला असता कोणतेही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माजी सैनिकांना मूळ वेतन देण्यात यावे असे शासनाने ही शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर आणि ठाणे महानगरपालिका राज्य शासनाच्या नियमांचे पालन करून मूळ वेतन प्रमाणे वेतन दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई महानगरपालिकेला माजी सैनिकांला मूळ वेतनाप्रमाणे वेतन न देण्याचे नेमके काय कारण आहे,

(६) असल्यास, माजी सैनिकांना मूळ वेतनाप्रमाणे कधीपर्यंत वेतन दिले जाणार आहे,

(७) नसल्यास, त्यांची नेमके काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संसथा असून तिची स्वतंत्र सेवा नियमावली तसेच निवृत्ती वेतन नियमावली असून महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ हे नियम बृहनमुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांना लागू नाहीत.

(३) हे खरे नाही.

(४) पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नागपूर महानगरपालिकांच्या बाबतीत हे खरे आहे.

ठाणे महानगरपालिकेत, सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या व सद्य:सिथतीत ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सुरक्षा विभागाकडे “आरक्षक” या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेने वेळोवेळी लागू केलेल्या लवादांनुसार व तयास अनुसरुन पारित केलेल्या ठरावांनुसार “आरक्षक” पदासाठी जी वेतनश्रेणी निश्चित करण्यात आली आहे त्यानुसार मूळ वेतन दिले जाते.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून तिची स्वतंत्र सेवा नियमावली तसेच निवृत्ती वेतन नियमावली असून महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ हे नियम बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांना लागू नाहीत.

शासनामध्ये सुरक्षा रक्षक प्रवर्गास अनुज्ञेय असलेल्या ग्रेड वेतनापेक्षा (रु.१३००/-) महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षकांचे ग्रेड वेतन (रु.१९००/-) जास्त असून, शासन निर्णयानुसार या पदधारकांची वेतन निश्चित करण्यात येईल असे जाहिरातीत नमूद करण्यात आलेले नाही.

(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे (जि.धुळे) शहरातील देवपूर भागात ज्वेलर्सने नागरीकांची फसवणूक केल्याबाबत**

**(२) ५५५८९ (२३-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे (जि.धुळे) शहरातील देवपूर भागात ज्वेलर्सचे दुकान टाकून परराज्यातील तिघांनी अनेक नागरीकांची सोने चांदीचे दागिन्यांसह लाखो रुपयांची फसवणूक केल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी पश्चिम देवपूर पोलीस स्टेशन, भाग-५ धुळे येथे गु.र.नं. ५८/२०१६ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ प्रमाणे ३ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील आरोपी अद्याप फरार असून ते मूळचे राजस्थानातील असल्याने त्यांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र पथक राजस्थान येथे पाठविण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

---

**मुंबईतील सांताक्रुझ,चेंबूर लिंक रोड, कुर्ला स्थानकाकडून पश्चिमेकडे येणाऱ्या स.गो.बर्वे मार्ग या रस्त्याच्या जंक्शनवर, हलाव पुलाखाली सरकते जिने बसविण्याबाबत**

**(३) ६१५३७ (२९-०८-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांताक्रुझ, चेंबूर लिंक रोड, कुर्ला स्थानकाकडून पश्चिमेकडे येणाऱ्या स.गो.बर्वे मार्ग या रस्त्याच्या जंक्शनवर, हलाव पुलाखाली, नेताजी नगर समोरुन जाणा-या रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक टाकुन रस्ता बंद करण्यात आल्यामुळे एका वर्षात जवळजवळ १८ अपघात व ५ जणांचा अपघाती मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघाताचे प्रमाण रोखण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी हलाव पुलाखाली, सरकते जिने बसविण्याबाबत महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई यांना दिनांक ०४ मार्च, २०१६ रोजी व त्यानंतर अनेक वेळा पत्रव्यवहार करुन अदयापी कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याठिकाणी सरकते जिने सहा महिन्यामध्ये बसविण्याबाबतचे आश्वासन महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई यांनी लोकप्रतिनिधी समवेत दि.१५ मार्च,२०१६ रोजी झालेल्या बैठकीत दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी सरकते जिने बसविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१७)** :(१) नमूद ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक टाकण्यापुर्वी झालेले अपघात :-

| वर्ष | अपघात | जखमी | मयत |
|---|---|---|---|
| जुलै, २०१४ ते जुलै, २०१५ | ६ | ५ | १ |

नमूद ठिकाणी रस्त्याच्या मध्यभाग दुभाजक टाकल्यानंतर झालेले अपघात :-

| वर्ष | अपघात | जखमी | मयत |
|---|---|---|---|
| जुलै, २०१५ ते जुलै, २०१६ | ७ | ५ | २ |

(२) माहे मार्च, २०१६ च्या दरम्यान स्थळ पाहणी करुन सरकते जिने बसविण्याबाबतची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) जीना बसविण्याकरीता सल्लागारांच्या पॅनल नियुक्तीची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे व त्याकरीता स्थायी समितीची मंजूरी मिळालेली आहे. या कामासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आलेली असून पुढील प्रक्रिया प्राधान्याने करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील केबीसी गैरव्यवहाराच्या आरोपीला अटक करण्यात आल्याबाबत**

**(४) ६१८१८ (२३-०८-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केबीसी गैरव्यवहारातील मुख्य सुत्रधार भाऊसाहेब चव्हाण या आरोपीला अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहार प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७) :**(१) व (२) होय.

सदर प्रकरणी नाशिक शहर पोलीस स्टेशन, आडगांव येथे गुरनं १५४/२०१४ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४, ५०७, १२० (ब) ३४ सह एम.पी.आय.डी. ॲक्टकलम ३ व ४ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील मुख्य आरोपी केबीसी कंपनीचे संचालक भाऊसाहेब चव्हाण यांच्यासह एकूण १२ आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दि.१०/१०/२०१४ रोजी दोषारोपपत्र व दि.२१/१२/२०१६ रोजी पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्हयाचा अधिक तपास सीआरपीसी १७३ (८) प्रमाणे चालू आहे.

सदर गुन्हयाच्या तपासात आजपर्यंत एकूण ८२३० गुंतवणूकदारांची एकूण रक्कम २१२,४०,४०३८०/- रुपयांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

केबीसी फसवणूक प्रकरणातील अटक आरोपी व केबीसी कंपनीचे नावावरील स्थावर व जंगम मालमत्तेबाबत एम.पी.आय.डी. ॲक्ट १९९९ चे कलम ३ व ४ नुसार जपत होवून पुढील कायदेशीर कारवाई होणेकरीता सक्षम अधिकारी म्हणून उप जिलहाधिकारी, नाशिक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार गुंतवणूकदारांना त्यांची गुंतवणूकीची रक्कम परत मिळवून देणेसाठीची पुढील कायदेशीर कार्यवाही त्यांचे मार्फतीने सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) येथे पोलिसांच्या सहकारी सोसायटीस २ एफएसआय देऊन १० हजार घरे उभारण्याच्या निर्णयाबाबत**

**(५) ६६३४९ (१६-०१-२०१७). श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथे पोलिसांसाठी उभारावयाच्या गृहनिर्माण सोसायटयांसाठी २ एफएसआय देऊन १० हजार घरे उभारण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) :**(१) व (२) मुख्य प्रवर्तक, बृहन्मुंबई पोलिस सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांनी मौ.वयाळ, ता.खालापूर येथील जमिनीवर त्यांच्या पोलिस हौसिंग प्रक्लपाकरिता २.०० चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची विनंती शासनास दि.६/६/२०१६ च्या पत्रान्वये केली होती. तद्नंतर उक्त अर्जदार संस्थेने पुन्हा दि.२१/११/२०१६ च्या पत्रान्वये त्यांचे उक्त जमिनीस विशेष नगर वसाहत प्रकल्पाचा दर्जा प्रदान करुन २.०० चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची विनंती शासनास केली. अर्जदार संस्थेस एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प राबविण्याकरीता काही अटी व शर्तीसापेक्ष तसेच एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाच्या नियमावलीतील तरतुदींच्या अधिन राहून लोकेशनल क्लिअरन्स प्रदान करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच परिगणीत होणारे अधिमुल्य व प्रक्रिया शुल्क भरणेबाबत अर्जदार संस्थेस दिनांक ३१/३/२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील सुर्यनगर भागात डब्बा ट्रेडिंगमधील आरोपींनी हवेत गोळीबार केल्याबाबत**

**(६) ७०२५५ (११-०१-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील सुर्यनगर भागात डब्बा ट्रेडिंग नावाने बोगस शेअर बाजार चालविणाऱ्या गैरव्यवहारातील दोन आरोपी आपल्या पेंट हाऊसच्या बाल्कनीमधून बंदूकीतून हवेत गोळीबार करित असल्याचे व्हिडिओ वायरल झाल्याने नागरिकांच्या सुरक्षितेवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१७) :**(१) नागपूर येथील सुर्यनगर भागात डब्बा ट्रेडिंग नावाने बोगस शेअर बाजार चालविणाऱ्या घोटाळयातील आरोपींनी आपल्या पेंट हाऊसच्या बाल्कनीतून बंदुकीतून हवेत गोळीबार करीत असल्याचे व्हिडीओ वायरल झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) सदर प्रकरणी दोन आरोपींवरूिध्द कळमना पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे अप क्र. ४७९६/१६ शस्त्र अधिनियम १९५९ कलम ३० सहकलम ३३६, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर प्रकरणाच्या तपासामध्ये अग्नीशस्त्र न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे पाठविले असता ते अग्नीशस्त्र नसून सिंगल पिस्टल (टॉयगन) असून पुढील बाजूने बॅरल लॉक आहे असा अभिप्राय प्राप्त आहे.

सदर घटनेबाबतच्या सीडीचे बारकाईने तपासणी केली असता सीडीतील अग्नीशस्त्र हे टॉयगन असल्याचे लक्षात येते. सदरचा गुन्हा घडलेलाच नसून गैरसमजुतीने दाखल झालेला आहे. सदर गुन्ह्यात क फायनल क्रमांक ०२/१७ मंजुरीकरीता पाठविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपुर येथील पाण्याचे नमुने घेण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण दिले असल्याबाबत**

**(७) ७२३४० (२७-०१-२०१७). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपुर (जि.चंद्रपूर) येथील पाण्याचे नमुने घेण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण प्राधिकरणास दिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरातील १२ पाण्यांच्या टाक्यांना छत नाही त्यापैकी ३ पाणी टाक्या जीर्ण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१२-१२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) • चंद्रपूर शहरात सद्यस्थितीत १२ पाण्याच्या टाक्या आहेत. त्यापैकी २ टाक्या जिर्ण असल्याचे तसेच यासर्व टाक्यांना कॉँक्रीटचे छत असल्याचे आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांनी दिनांक २ नोव्हेंबर,२०१७ च्या पत्रान्वये कळविलेले आहे.

• तसेच या दोन टाक्यांऐवजी नवीन टाक्या बांधण्याची कार्यवाही अमृत योजनेअंतर्गत प्रस्तावित असून एका टाकीचे बांधकाम सुरु असल्याचे व दुसऱ्या टाकीचे बांधकाम लवकरच हाती घेण्यात येत असल्याचे कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्हयातील युवकांना नोकरीचे अमिष दाखवून फसवणूक करण्यात आल्याबाबत**

**(८) ७८०८५ (२०-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्हयातील दहावी पास-नापास अनेकांना नोकरीचे आमिष दाखवून प्रत्येकी पाच लाख रुपये घेऊन अनेकांना तीन कोटी पेक्षा जास्त रुपयांना फसविल्या प्रकरणी आजरा पोलिस स्टेशन मध्ये माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१७) :** (१) व (२) सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हयातील दहावी पास-नापास युवकांना नोकरीचे आमिष दाखवून फसविल्याप्रकरणी तक्रारी प्राप्त केल्या आहेत. त्यानुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यात २ गुन्हे, सातारा जिल्ह्यात ४ गुन्हे व सांगली जिल्ह्यात १ गुन्हा असे एकूण ७ गुन्हे दाखल असून ते खालीलप्रमाणे आहेत.

१) आजरा पोलीस स्टेशन, कोल्हापूर गु.र.नं.१२२/२०१६ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ४६४, ४६८, ४७१, ३४

२) करवीर पोलीस स्टेशन, कोल्हापूर गु.र.नं.३६६/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ३४

३) कोरेगाव पोलीस स्टेशन, सातारा गु.र.नं.१५७/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४६८,४६७, ४७१

४) भुईज पोलीस स्टेशन, सातारा गु.र.नं.२७४/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०

५) सातारा शहर पोलीस स्टेशन, गु.र.नं.७८२/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ३४

६) कोरेगाव पोलीस स्टेशन, सातारा गु.र.नं.१०८/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४६८,४६७, ४७१

७) विटा पोलीस स्टेशन, सांगली गु.र.नं.२७१/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०

उक्त गुन्ह्यात एकूण १९ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी १५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच उपरोक्त क्र. १ व २ गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. उर्वरीत ५ गुन्हे पोलीस तपासावर आहेत.
(३) विलंब झालेला नाही.

---

## मुंबई शहरातील वाहतूक यंत्रणेला नवा पर्याय म्हणून नरिमन पॉईंट ते बोरिवली या सागरी प्रकल्पाकरिता वॉटर टर्मिनस कार्पोरेशन स्थापन करण्याबाबत

**(९) ८११२१ (१३-०४-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील वाहतूक यंत्रणेला नवा पर्याय म्हणून नरिमन पॉईंट ते बोरिवली या सागरी प्रकल्पाकरिता वॉटर टर्मिनस कार्पोरेशन स्थापन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावासाठी माहे जानेवारी/फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निविदा मागविण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाचे स्वरुप काय आहे व सदर प्रस्ताव किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) तसेच, शासनाने सदरहू प्रकल्प पुर्ण करण्याबाबत अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१७) :** (१) नाही.
(२) नाही.

वॉटर ट्रान्सपोर्ट कार्पोरेशनची स्थापना करण्याकरिता केवळ सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(३) व (४) सद्य:स्थितीत नरिमन पॉईंट ते बोरिवली जलप्रवासी वाहतूकीबाबत सुसाध्यता व प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यात येत आहे. कार्यवाही बाकी आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कर्नाटकातील बंगळुरच्या शिक्षण संस्थेकडून नागपूरच्या विद्यार्थ्यांची झालेली फसवणूक**

**(१०) ८११८४ (२१-०४-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटकातील बंगळुरच्या महाविद्यालयात केवळ पाच हजार रूपये शुल्क घेवून विद्यार्थ्यांना बीएससी नर्सींग, जनरल नर्सींग, जीएनएमच्या अभ्यासक्रमाला प्रवेश देण्याचे आमिष दाखवून संबधित संस्थेच्या नागपूर येथील एजंटने अनेक विद्यार्थ्यांकडून लाखो रूपये वसूल करून फसवणूक केल्याबाबतची तक्रार विद्यार्थ्यांनी दिनाक २७ जानेवारी, २०१७ रोजी धंतोली पोलीस ठाण्यात केली असल्याची माहिती दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एजंटने विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी ८० हजार ते एक लाख रूपयांची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्याचा तपशिल काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन धंतोली, नागपूर येथे दोन आरोपितांविरुध्द अप क्र. २९/१७ कलम ४२०, ३४ भा.द.वि. अन्वये दि.०८.०२.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपितांनी कर्नाटक, बेंगलोर येथील प्रगती इंस्टीट्यूट ऑफ नर्सिंग येथे प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांकडून रु. ३०००/-, रु. ५०००/, रु.१००००/, रु.८००/- व रु.५००/- इतकी रक्कम घेतली आहे. तसेच तद्‌नंतर समाजकल्याण विभागाकडून स्कॉलरशिप देण्यास नकार दिला आहे असे दाखवून रु.८०,०००/- कॉलेज मध्ये जमा करा अन्यथा तुम्हाला परिक्षा देता येणार नाही असे सांगून विद्यार्थ्यांची फसवणुक केली आहे. सद्यस्थितीत गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई येथील अपंग पोलीस शिपाई यांना वेतन व पदोन्नती तसेच मृत पोलीस शिपाई त्यांच्या पत्नीस अनुकंपातत्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(११) ८३१५५ (२१-०४-२०१७). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गावदेवी पोलीस ठाणे, मुंबई येथील अपघाताने अपंगत्व आलेले पोलीस शिपाई श्री.संजयकुमार गोसावी, बक्कल क्र.३४३२० यांना पोलीस नाईक पदाचा मानीव दिनांक १ एप्रिल, २००४ हा मंजूर करण्यात आलेला असून त्यांना देय असलेले वेतन व भत्यांची रक्कम अदा करण्याबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिनांक ८ नोव्हेंबर, २०१६ रोजी आदेश देवून ४ महिन्यांचा कालावधी उलटूनही अद्याप अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभागाकडून थकित रक्कम अदा करण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सांताक्रुझ (पश्चिम) पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असलेले श्री.मनोज रामचंद्र कदम (बक्कल क्रमांक ३४२५१) यांचा कर्तव्यावर तैनात असताना दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास आकस्मिक मृत्यू झाला असून त्यांच्या पत्नी श्रीमती सरस्वती मनोज कदम यांच्या वयाची मर्यादा व प्रतिक्षायादीतील क्रमांक लक्षात घेवून विशेष बाब म्हणून शासकीय सेवेत अनुकंपा तत्वावर त्वरीत नियुक्ती करण्यातबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग (१) प्रकरणी थकित रक्कम त्वरीत अदा करण्यास विलंब लागण्याची कारणे काय असून सदर कार्यवाहीस जाणीवपर्वक विलंब करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी श्री.संजय गोसावी, पो.शि.क्र.३४३२० यांना अपंग कायदा (समान संधी, हक्काचे संरक्षण व पूर्ण सहभाग) कायदा १९९५ मधील तरतुदीच्या अनुषंगाने लाभ देण्याबाबत दि.०८.११.२०१६ च्या आदेशान्वये आदेशित केले या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने दि.०८ मे, २०१७ अन्वये श्री.गोसावी यांना सेवा संरक्षणासहित सर्व लाभ देण्याकरीता १५.०८.२००४ पासून "पोलीस नाईक" संवर्गाचे अधिसंख्य पद निर्माण करण्यास मान्यता दिली. पो.शि. श्री.गोसावी यांचे खाती रू.६,६४,७७७/- जमा करण्यात आले आहे.

(२) श्रीमती सरस्वती मनोज कदम यांनी अनुकंपा तत्वावर लिपिक पदी नियुक्ती देणेकरीता दि.०१.१०.२०१५ रोजी सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने कागदपत्र पडताळणी केली असता त्यांचा जन्मदिनांक ०७.०६.१९७२ असल्याने त्यांचे वय विहित शासकीय नियमानुसार ४५ पेक्षा जास्त होत असल्याने त्या अपात्र ठरत आहेत.

(३) श्री.गोसावी यांचे प्रकरणी जाणीपूर्वक विलंब झालेला नसल्याने अधिकारी/कर्मचा-यांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र व राज्य शासन वैद्यकीय प्रतिनिधींसाठी असलेल्या कामगार कायद्याच्या अंमलबजावणीत दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(१२) ८३९११ (२१-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासन वैद्यकीय प्रतिनिधींसाठी असलेल्या कामगार कायद्याच्या अंमलबजावणीत दुर्लक्ष करीत असल्याने औषध कंपन्या वैद्यकीय प्रतिनिधींना बेकायदेशीरपणे कामावरुन काढून टाकणे, पगार थांबवून मानसिक त्रास देणे, विक्रीसाठी दबाव आणणे इ. प्रकारे त्रास देत असून त्यामुळे राज्यातील अनेक वैद्यकीय प्रतिनिधींनी आत्महत्या केल्या असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, औषधांच्या ऑनलाईन विक्रीवर बंदी आणावी, औषधांच्या व वैद्यकीय उपकरणांच्या किंमती व त्यावरील अबकारी कर उत्पादन खर्चावर असावेत, केंद्राने औषधांवर जीएसटी लावू नये इत्यादी मागण्यांसाठी लातूर येथील वैद्यकीय प्रतिनिधी संघटनेने दिनांक ३ फेब्रुवारी, २०१७ रोजी रॅलीचे आयोजन केले होते, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने दखल घेवून या वैद्यकीय प्रतिनिधींच्या मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२४-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

महाराष्ट्र सेल्स अँण्ड मेडिकल रिप्रेझेंटिव्ह असोशिएशनने मागण्यासाठी दिनांक.०३/०२/२०१७ रोजी लातूर शहरात रॅलीचे आयोजन केले होते.

(३) महाराष्ट्र सेल्स अँण्ड मेडिकल रिप्रेझेंटिव्ह असोशिएशन, मुंबई यांनी मोर्चाव्दारे दि.०३/०२/२०१७ रोजी कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना निवेदन दिलेले आहे, त्याअनुषंगाने कामगार कायदयाची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक १४/०२/२०१७ रोजीच्या पत्राव्दारे कामगार आयुक्त कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय कार्यालयांना निर्देश दिलेले आहेत.तसेच निवेदनातील केंद्र शासनाशी निगडीत मुद्यांच्या अनुषंगाने संबंधित मुद्दयांबाबत कार्यवाही करण्यासाठी प्रादेशिक कामगार आयुक्त, ( केंद्रीय ) सायन, मुंबई विक्रीकर आयुक्त, विक्रीकर भवन, बांद्रा, मुंबई व आयुक्त, अन्न औषधे प्रशासन, बांद्रा, मुंबई यांच्याकडून होणे आवश्यक आहे त्याबाब उचित कार्यवाही करण्याबाबत संबंधित कार्यालयांना दिनांक २७/३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाच्या निर्मितीबाबत**

**(१३) ८४८७१ (०४-०९-२०१७). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असल्याचे माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीय काय आढळून आले व तद्नुसार पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या व वाढत्या गुन्हेगारींवर अंकुश ठेवण्याकरिता स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाच्या प्रस्तावास मंजूरी देऊन ते निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून पिंपरी चिंचवड, पुणे येथे पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमध्ये वाहतूक पोलीस विभागाने ई-चलन प्रक्रीया राबविल्याबाबत**

**(१४) ८५०३२ (०४-०९-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये वाहतूक पोलीस विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ई चलन प्रक्रीयेमार्फत गत ६ वर्षाच्या तुलनेत गत ६ महिन्यातच वाहतुकीचे नियम तोडणाऱ्यावर मोठ्या प्रमाणात कारवाई केल्याचे माहे जून २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, वाहतुकीचे नियम तोडणाऱ्यावर अधिकचे निर्बंध यावेत म्हणून दंडात्मक रक्कमेमध्ये वाढ केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) परंतु वाहतुकीचे नियम तोडणाऱ्यावर ई चलन प्रक्रीयेमार्फत दंड आकारला असतानाही दंडाची रक्कम वेळेत वसूल होत नसल्याने सदर प्रक्रीयेमार्फत लवकरात लवकर दंडाची रक्कम वसुली होईल यासाठी शासन आधुनिक तंत्रज्ञान वापरणार आहे काय,

(४) तसेच, नियम तोडणाऱ्या व्यक्तीवर ई चलन किंवा सीसी टीव्ही मार्फत कारवाई केली असता याबाबतची माहिती संबंधित व्यक्तीला ई मेल अथवा मोबाईल मेसेज द्वारे मिळावी

यासाठी परिवहन कार्यालयामध्ये वाहन नोंदणी करताना किंवा वाहन चालक परवाना काढताना अद्ययावत माहिती उपलब्ध व्हावी याबाबत शासनाने कोणती  उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१७) :** (१) मुंबईमध्ये वाहतूक पोलीस विभागाकडून करण्यांत आलेल्या सन २०१२ ते २०१६ आणि ई चलन प्रक्रियेमार्फत माहे जानेवारी, २०१७ ते जून, २०१७ पर्यंत कारवाईबाबतची संख्यात्मक माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

| **वर्ष** | **कारवाई** |
|---|---|
| २०१२ | १४,९८,०४२ |
| २०१३ | २०,२८,६५५ |
| २०१४ | २०,७९,८२२ |
| २०१५ | १८,३४,१४९ |
| २०१६ | १७,०६,१९१ |
| माहे जानेवारी, २०१७ ते माहे जून, २०१७ | १६,६८,६१९ |

(२) होय.

शासन अधिसूचना क्रमांक एमव्हीआर-०७१६/ प्र.क्र.३४३/परि-२, दिनांक ०४.०८.२०१६ अन्वये दंडात्मक रकमेमध्ये वाढ करण्यांत आलेली आहे.

(३) होय.

१. मुंबई पोलीस वाहतूक शाखेकडून विकसीत करण्यांत आलेल्या एमटीपी ॲप या ॲपद्वारे वाहनधारकास वाहतूक नियमांची माहिती उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. वाहनावर केलेल्या कारवाई माहिती मिळण्याकरीता वाहन मालकास त्यांचा वाहन क्रमांक व मोबाईल नंबरची नोंदणी केल्यानंतर वाहन मालकास त्याच्या वाहनावर वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघनाची कारवाई केल्याची माहिती उपलब्ध होते.

२. ई चलन मशीनद्वारे तडजोड रक्कम तसेच न भरलेल्या प्रलंबित चलनाची तडजोड रक्कम वसूल करण्यांत येते.  तसेच त्यावर यापुर्वी ई चलनाद्वारे करण्यांत आलेल्या सर्व कारवायांचा अभिलेख दिसून येतो.

३. www.trafficpolicemumbai.maharashtra. gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केल्यास वाहनधारकास त्याच्या वाहनक्रमांकावर नोंद होणाऱ्या चलन कारवाईची माहिती एसएमएस द्वारे मिळू शकते.

४. ई चलन प्रक्रियेमार्फत वसूल करण्यांत यावयाच्या दंडाची रक्कम भरण्याकरीता आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे M Paisa / Paytm / CC Avenue / MPAD / Itz Cash यासारख्या पाच “गेटवेज”च्या सुविधा पुरविण्यांत आलेल्या आहेत.

५. ई चलन मशीनद्वारे डेबिट कार्ड / क्रेडिट कार्ड स्वाईप करुन चलनाची तडजोड रक्कम भरण्याची सुविधा पुरविण्यांत आलेली आहे.

(४) या प्रकरणी मोटार परिवहन कार्यालयात नोंद करण्यांत आलेल्या वाहनधारकाची अद्ययावत माहिती वाहतूक शाखेस उपलब्ध व्हावी तसेच वाहतूक शाखेकडून करण्यांत आलेल्या वाहतूक नियम उल्लंघनाबाबतच्या माहितीची देवाणघेवाण करण्याबाबत उपाययोजना करण्यांत येत आहेत. त्याकरीता परिवहन आयुक्तांसमवेत बैठक घेण्यांत आली असून परिवहन विभागाच्या संकेतस्थाची वाहतूक शाखेच्या संकेतस्थळाशी जोडणी करण्याकरीता कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे ग्रामीण मतदार संघात कुसूंबा व शिरुड येथे नविन पोलीस ठाणे निर्मितीच्या प्रस्तावाबाबत

**(१५) ८५२६९ (०४-०९-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे ग्रामीण मतदार संघाची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन तालुक्यातील कुसूंबा व शिरुड येथे २ नविन पोलीस ठाणे निर्मितीबाबत गृह विभागाने जिल्हा पोलीस अधिक्षकांना प्रस्ताव सादर करण्याचे आदेश पारित केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात जिल्हा पोलीस अधिक्षकांनी शासनास प्रस्ताव सादर केले आहेत काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव सादर केले असल्यास, शासनाने त्यावर निर्णय घेऊन सदर दोन्ही पोलीस ठाणे व कर्मचारी निवास बांधकामासाठी निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१७) :** (१), (२) व (३) धुळे ग्रामीण तालुक्यातील कुसूंबा व शिरुड येथे पोलीस ठाण्याची निर्मिती करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात आले आहे. पोलीस महासंचालक यांच्याकडून अद्याप अहवाल अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर येथे मुख्यमंत्र्यांच्या हेलिकॉप्टरला झालेला अपघात

**(१६) ८५३५३ (०४-०९-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड),**

**श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथे शासकीय कार्यक्रमानंतर मा.मुख्यमंत्री यांना घेऊन मुंबईकडे प्रयाण करणाऱ्या शासकीय हेलिकॉप्टरमध्ये बिघाड झाल्याचे वैमानिकांचे लक्षात येताच सुरक्षितपणे उतरविण्याच्या प्रयत्नात असताना विजेच्या तारामध्ये अडकून हेलिकॉप्टर जमिनीवर आदळून दिनांक २५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास अपघात झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार याप्रकरणी संबंधित दोषीं असणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७) :** (१) होय.

(२) विमानतळ हा केंद्रीय विषय असल्याने या सर्व प्रकाराची सखोल चौकशी केंद्र शासनाच्या अखत्यारितील Aircraft Accident investigation Bureau आणि अमेरिकेतील National Tansport Security Board या एजन्सीमार्फत सुरु आहे.

(३) कार्यवाही चालू आहे.

(४) या अपघातामध्ये तांत्रिक बाबी अंतर्भूत असल्यामुळे व या तांत्रिक बाबीबाबतची सखोल चौकशी सुरु असून सदर माहिती परदेशी कंपनीकडून येणे बाकी आहे.

---

**जीफोरएस आणि बीआयएस या अग्रगण्य सिक्युरिटी कंपन्यांनी सुरक्षा रक्षकांना बेकायदाशीरपणे प्रशिक्षण दिल्याबाबत**

**(१७) ८५३८८ (०४-०९-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत खाजगी सुरक्षा रक्षक पुरविणा-या ग्रुप फोर सिक्युरिटी सोल्युशन (जीफोरएस) व बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (बीआयएस) या अग्रगण्य कंपन्यांनी सुरक्षा रक्षकांना बेकायदाशीरपणे प्रशिक्षण दिल्या प्रकरणी खाजगी सुरक्षा यंत्रणा अधिनियम २००५ चा (पसारा) भंग केल्याप्रकरणी दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास गृह रक्षक दलाने नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दोन्ही कंपन्यांनी, अनुक्रमे २५० व १८३ खाजगी सुरक्षा रक्षकांना परस्पर प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र देऊन त्यांची विविध ठिकाणी नियुक्ती केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने दखल घेऊन, दोन्ही दोषी कंपनीच्या मालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) अवैध प्रशिक्षण दिल्यामुळे पसारा ॲक्ट,२००५ अंतर्गत नियम क्र.२० अन्वये कार्यवाही करण्याबाबत जी फोरएस व बीआयएस या कंपन्याना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.मात्र बीआयएस या कंपनीने प्रस्तावित कारवाई विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने प्रस्तावित केलेल्या कारवाईस सद्यस्थितीत स्थगिती दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियान प्रशिक्षीत कर्मचा-यांच्या अभावामुळे संथ गतीने राबविले जात असल्याबाबत**

**(१८) ८५६५० (०४-०९-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियान प्रशिक्षीत कर्मचा-यांच्या अभावामुळे संथ गतीने राबविले जात असल्याची बाब दिनांक १५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदर अभियानाची गती वाढविण्याकरीता प्रशिक्षीत कर्मचा-यांची भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०८-११-२०१७) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमधील मंजुर पदांना सन २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे पोलिस आयुक्तालयांच्या कार्यकक्षेतील वर्तकनगर पोलिस स्टेशनच्या हद्दीतील एका महिलेने इतर महिलांची लक्षावधी रुपयांची फसवणुक केल्याबाबत**

**(१९) ८६३५६ (०४-०९-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे पोलिस आयुक्तालयांच्या कार्यकक्षेतील वर्तकनगर पोलिस स्टेशनच्या हद्दतील लोकमान्यनगर येथील एका महिलेने इतर महिलांची लक्षावधी रुपयांची फसवणुक केल्याप्रकरणी दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास वर्तकनगर पोलिस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर महिलेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७) :** (१) (२) व (३) सदर प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यकक्षेतील वर्तकनगर पोलीस स्टेशन येथे कुठल्याही प्रकारची तक्रार दाखल करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नस्तनपूर (ता.नांदगाव, जि.नाशिक) या ठिकाणी कायमस्वरूपी पोलीस चौकीची निर्मिती करणेबाबत**

**(२०) ८६५७७ (०४-०९-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नस्तनपूर (ता.नांदगाव, जिनाशिक) येथे भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून कायमस्वरूपी पोलीस चौकीची निर्मिती करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री शनिदेव मंदिर नस्तनपूर (जि.नाशिक) येथे येणारे भाविक व पर्यटकांच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी पोलीस चौकी निर्मितीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) नस्तनपूर (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथे कायमस्वरुपी पोलीस चौकीची निर्मिती करण्याबाबतच्या निवेदनाच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील सेव्हन हिल्स रियालिटीज प्रा.लि. या कंपनीने कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत**

**(२१) ८६९१५ (०४-०९-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील अनेक गुंतवणुकदारांची सेव्हन हिल्स रियालिटीज प्रा.लि. या कर्नाटकातील वित्त कंपनीने कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गुंतवणुकदारांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात कंपनीविरुध्द तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१७) :** (१), (२) व (३) सेव्हन हिल्स कंपनीने केलेल्या फसवणूकीसंदर्भात फौजदार चावडी पोलीस स्टेशन, सोलापूर शहर येथे गु.र.नं. २०४/२०१७ भा.दं.वि. कलम ४०६, ४१७, ४२०, ३४ सह महाराष्ट्र ठेविदारांचे हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे दि.०७/०४/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याच्या तपासात सदर कंपनीने सोलापूर शहरातील ठेविदारांना पिग्मी योजना, रिकरिंग डिपॉझिट, फिक्स डिपॉझिट, कल्याण योजना, विद्या योजना, दामदुप्पट योजना, मंथंली इन्कम, सुवर्ण योजना अशा ७ प्रकारच्या योजना राबवून गुंतवणूकदारांना आकर्षक परताव्याची हमी दाखवून त्यांची एकूण ९३,३९,४५७/- इतक्या रक्कमेची फसवणूक केल्याचे अद्यापपर्यंतच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

सदर गुन्ह्यात १२ आरोपी निष्पन्न झाले असून सर्व आरोपी कर्नाटक राज्यातील आहेत. त्यापैकी काही आरोपींना सा.आय.डी बेंगलोर पोलीसांनी इतर गुन्ह्यात अटक केलेली आहे. गुन्ह्यातील आरोपींची खात्रीशीर माहिती मिळवून त्यांना अटक करण्यावर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**शिंगणापूर (जि.सोलापूर) येथे टॅम्पोला अपघात होवून १२ भाविक गंभीर जखमी झाल्याबाबत**

**(२२) ८६९१६ (०४-०९-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील माळशिरसपासून ३६ कि.मी. अंतरावर शिंगणापूर येथे दिनांक ४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास टॅम्पोला अपघात होवून १२ भाविक गंभीर जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघाताबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१७) :** (१) सदर अपघात दि.०४/०४/२०१७ रोजी शिंगणापूर येथे घडला नसून माळशिरस ते वेळापूर रोडवर माळशिरस येथे दि.०५/०४/२०१७ रोजी घडला आहे. त्यात १२ जण जखमी झाले आहेत.

(२) व (३) सदर घटनेबाबत माळशिरस पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ९१/२०१७ भा.दं.वि.कलम २७९, ३३७, ३३८, ४२७, सह मोटार वाहन कायदा, कलम १८४, १३४(ब)/१७७, १५८/१९२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात वाहन चालकाने हयगयीने वाहन चालविल्याने टेंम्पोचे टायर फुटून सदर अपघात घडल्याचे निष्पन्न झाले आहे. गुन्ह्यात वाहन चालकास अटक करण्यात आली असुन तपास चालु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

### भोकर (जि.नांदेड) तालुक्यात अवैध व्यवसाय सुरू असल्याबाबत

**(२३) ८७३०५ (०४-०९-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) तालुक्यात गत अनेक काही महिन्यांपासून खुलेआम मटका, पत्त्यांचे क्लब, अवैध देशी दारु आणि गुटखा पुडीची विक्री सर्रास सुरु असून उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, पोलीस प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी भोकर शहरात कायदा सुव्यवस्था सुरळीत राहण्याऐवजी अवैध व्यवसायांनी जनता त्रस्त झाली असून वरिष्ठ अधिका-यांनी यावर प्रतिबंध घालून योग्य ती कार्यवाही करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा जनतेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भोकर (जि.नांदेड) तालुक्यातील अवैध व्यवसाय बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१७) :** (१) व (२) व (३) भोकर पोलीस स्टेशन येथे जुगार प्रतिबंध अधिनियमाअंतर्गत जानेवारी ते ऑगस्ट दरम्यान एकूण ७ गुन्हे दाखल आहेत. तसेच, एप्रिल, २०१७ मध्ये दारुबंदी अधिनियमाअंतर्गत एकूण १७ गुन्हे दाखल आहेत.

भोकर पोलीस स्टेशन हद्दीत तसेच, नांदेड जिल्ह्यात चोरुन लपून चालणाऱ्या अवैध धंद्याविरुध्द कायदेशीर कारवाई करुन अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत नांदेड

जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना आदेश देण्यात आले आहेत. तसेच, अवैध धंद्यासंबंधाने विशेष पथक स्थापन करण्यात आले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

### उस्मानाबाद जिल्हयातून पुण्यात आलेले दोन टन गोमांस जप्त केल्याबाबत

**(२४) ८७३६४ (१४-०८-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातून पुण्यात गोमांस विक्रीसाठी आणत असलेले टेम्पो गोरक्षकांनी सापळा रचून पकडल्याची घटना माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर गोमांस विक्रीस आणणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) याबाबत पोलीस स्टेशन कोरेगाव पार्क गु.र.क्र.७२/२०१७ अन्वये महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९९५ चे कलम ५ (अ) (ब) (क), ९ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये दोन आरोपींना अटक करण्यात आले असून ६०० किलो गोवंश सदृष्य मांस व एक टेंम्पो जप्त करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई विक्रोळी येथे महाराष्ट्र पोलिसांचे बोधचिन्ह असलेली जुनी खाकी वर्दीची बाजारात विक्री होत असल्याबाबत

**(२५) ८७४२७ (०४-०९-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विक्रोळी येथील बाजारात महाराष्ट्र पोलिसांचे बोधचिन्ह असलेली जुनी खाकी वर्दी केवळ २०० रुपयात जुने कपडे विक्रेत्यांकडे मिळत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,चौकशीत काय आढळून आले व तदनुसार महाराष्ट्र पोलिसांचे बोधचिन्ह असलेली जुनी खाकी वर्दी बाजारात विकली जाऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी विक्रोळी पोलीस ठाणे येथे भा.द.वि. कलम १७१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीस अटक करण्यात येऊन न्यायालयात हजर केले होते. मा.न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. तसेच पोलीसांचा बोधचिन्ह असलेला शर्ट जप्त करण्यात आला आहे. आरोपीने सदरचा शर्ट जुने कपडे विकणा-या इसमाकडून घेतल्याचा कबुली जबाब दिला आहे. भविष्यात पोलीसांचा बोधचिन्ह असणारा शर्ट न विकण्याबाबत जुने कपडे विक्रेत्यांना समज देण्यात आली असून, जुने कपडे विकणा-या भांडीवाल्यांची पोलिसांकडून वेळोवेळी तपासणी सुरु आहे.सदर गुन्हयाचे दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे माळगांव (ता.सटाणा, जि.नाशिक) येथील देशी दारुचे दुकान जाळल्याबाबत**

**(२६) ८७५८० (०४-०९-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे माळगांव (ता.सटाणा, जि.नाशिक) येथील देशी दारुचे दुकान जाळल्याची घटना माहे एप्रिल,२०१७ च्या शेवटच्या आठवडयात घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी पोलीस पाटलांसह दोन जणांना पोलिसांनी अटक केल्याने महिलांनी तहसिल कार्यालयावर मोर्चाचे आयोजन केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे ही खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी सटाणा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ६७/२०१७ भा.दं.वि.कलम ३०७, १४३, १४७, १४८, १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४३६, ४२७ सह क्रिमीनल लॉ अमेंटन्टमेंट ॲक्ट कलम ७ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७/१/३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्यात २ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच, इतर आरोपी निष्पन्न करण्यावर गुन्ह्याचा तपास चालु आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा शहराला जोडणाऱ्या १७ रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत**

**(२७) ८७७११ (१२-०८-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) शहराला जोडणाऱ्या १७ रस्त्यांची दुरुस्ती करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान च्या पहिल्या आठवडयात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१७) :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत श्रीगोंदा नगरपरिषदेच्या रस्ते विकास प्रकल्पास मार्च, २०१५ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून कामाचे कार्यादेश एप्रिल, २०१७ मध्ये देण्यात आले आहेत, हे खरे आहे.
(२) व (३) प्रकल्पात समाविष्ट कामाच्या २५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर असल्याचे श्रीगोंदा नगरपरिषदेने कळविले आहे.

---

**मुंबई व उपनगरात स्वस्तात म्हाडाचे घर देण्याचे आमिष दाखविणाऱ्या टोळीने अनेकांना दोन वर्षात करोडो रुपयांना फसविल्याबाबत**

**(२८) ८७७४४ (०४-०९-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व उपनगरात म्हाडाच्या इमारतीचे बांधकाम सुरु असलेल्या जागेवर (साईटवर) गरजू लोकांना नेऊन त्याठिकाणी स्वस्तात म्हाडाचे घर देण्याचे आमिष दाखविणाऱ्या टोळीने २५ लोकांसह अनेकांना दोन वर्षात करोडो रुपयांना फसविले असल्याचे फसवणुक झालेल्या तक्रारदाराने मुंबई येथील साकीनाका पोलीस स्टेशनमध्ये माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार दोषी असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मुंबई व उपनगरात म्हाडाच्या इमारतीचे बांधकाम सुरु असलेल्या जागेवर गरजु लोकांना नेऊन त्या ठिकाणी स्वस्तात म्हाडाचे घर देण्याचे आमिष दाखवणाऱ्या टोळीविरुध्द परिमंडळ-१० अंतर्गत साकिनाका व अंधेरी पोलीस ठाणे येथे प्रत्येकी १ असे, २ गुन्हे नोंद आहेत.

सदर प्रकरणी साकिनाका पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २१३/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४१९, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १७०, १२० (ब), ५०४, ५०६ (२), ३४ अन्वये ४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमूद गुन्ह्यातील आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच, अंधेरी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५९०/२०१६, भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ५०६ अन्वये ४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमूद गुन्ह्यातील आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे येथील "दिशा " संचालकाने सदनिका नोंदणीच्या नावाखाली अनेकांची फसवणूक केल्याबाबत

**(२९) ८७७५४ (०४-०९-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील "दिशा" संचालकाने आलिबाग, वाडा, मनोर येथील गृहनिर्माण प्रकल्पाची वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देवून सदनिका नोंदणीच्या नावाखाली अनेक लोकांची फसवणूक केली असल्याचे दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, बोरीवली येथील केयूर रुपरेप्रिया यांनी अलिबाग येथील प्रकल्पात सदनिकेची नोंदणी केली व सन २०१३ मध्ये करारनामा करून २८ लाख २२ हजार ९३३ रुपये दिशाचे संचालक श्री नाईक यांना दिली मात्र इमारतीचे बांधकामही सुरु नसल्याचे समजल्यानंतर आपली फसवणूक झाली म्हणून रुपरेप्रिया यांनी ठाणेतील चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असल्याचेही दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर संचालकावर कारवाई करण्याबाबत व गुंतवणूकदाराचे पैसे परत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७) :** (१) व (२) होय, सदरची घटना दिनांक ८.०५.२०१७ रोजी घडली आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-५ अंतर्गत चितळसर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १०६/२०१७, भा.दं.वि. कलम ४२०, ३४ अन्वये २ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद गुन्हयातील आरोपींना ४१ (१) प्रमाणे नोटीस देण्यात आलेली आहे. तसेच, सदर आरोपींना मा. जिल्हा सत्र न्यायालय, ठाणे यांचेकडून अंतरीम जामीन मंजूर झालेला असून नमूद गुन्हा तपासाधिन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोराळे (ता.वसमत, जि.हिंगोली) गावातील एका पित्याने मुलीला विष पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याबाबत**

**(३०) ८८१५० (०४-०९-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसमत तालुक्यातील (जि.हिंगोली) बोराळे या गावातील एका पित्याने दुसरी मुलगी झाली म्हणून अवघ्या दहा दिवसाच्या मुलीला विष पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न केला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात कुरुंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१७) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
या प्रकरणी पोलीस स्टेशन कुरुंदा येथे गु.र.नं. ३२/२०१७ भा.दं.वि. कलम ३०७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) सदर गुन्हयात आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. तपासात आरोपीने त्याच्या मुलीस विषारी औषध पाजल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हा सी.ए. अभिप्राय हस्तगत करणे व आरोपीविरुध्द दोषारोप पाठविण्यावर पोलीस तपासावर आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## ठाणे जिल्हयातील कल्याण येथील आंबिवली येथे गुन्हेगारांना पकडण्यासाठी गेलेल्या दोन पोलिसांवर पेट्रोलमिश्रित रॉकेल ओतून जाळण्याचा प्रयत्न केल्याबाबत

**(३१) ८८२३४ (०४-०९-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण जवळील (जि.ठाणे) आंबिवली स्टेशनजवळ इराण्यांच्या कबिल्यातील पोलिस रेकॉर्डवरील मोस्ट वॉण्टेड गुन्हेगार समीर इराणी आणि हसन इराणी या संशयीतांना ताब्यात घेण्यासाठी दिनांक ९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास उल्हासनगर मध्यवर्ती पोलीस ठाण्यातील पोलिसांचे एक पथक आंबिवली येथे गेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही आरोपींना ताब्यात घेवून त्यांना गाडीत घालून नेत असताना या कबिल्यातील एका टोळीने पोलिसांवर हल्ला चढविला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या टोळीने पोलीस निरक्षक सावंत व पोलिस नाईक महाजन यांच्या अंगावर पेट्रोलमिश्रित रॉकेल ओतून त्यांना जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) होय,

(३) पोलीस उप निरीक्षक श्री. सावंत व पोलीस नाईक श्री. महाजन यांचे अंगावर रॉकेल ओतून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

(४) सदर प्रकरणी खडकपाडा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ११०/१७, भादंवि कलम ३०७, ३३२, ३५३, ३४१, १४३, १४७, १४८, १४९, ५०४, २२४ क्रिमीनल ॲक्ट ७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी ३ आरोपींना अटक केली असून सध्या ते जामीनावर मुक्त आहेत. १० आरोपींनी मा. सेशन कोर्ट कल्याण येथे अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला आहे. उर्वरित ३ फरार आरोपींचा शोध सुरु आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शाहू महाराजांच्या पुतळ्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३२) ८८२९६ (०४-०९-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कला संचालनालयाकडे कोल्हापूर येथील शाहू महाराजांच्या पुतळ्याचे क्ले मॉडेल आणि शासनाच्या मुख्य वास्तुशास्त्रज्ञांकडे मंजूरीसाठी अंतिम रेखांकन सादर करण्यात आलेले नसल्याने शाहू पुतळा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंतिम रेखांकन सादर करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शाहू महाराजांच्या पुतळ्याचे काम लवकरात लवकर पुर्ण करण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पुतळा उभारण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडून करण्यात येत आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी दि. १६.०३.२०१७ रोजीच्या बैठकीत प्रस्तावाच्या अनुषंगाने मुख्यवास्तुशास्त्रज्ञ,कला संचालनालय यांची मान्यता पत्रे, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होत नसल्याबाबत बांधकाम विभागाच्या अभिप्रायासह सादर करण्याच्या सूचना जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना दिल्या आहेत. जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना सादर करणे आवश्यक आहे.

(३) पुतळयास मान्यता देण्याचे अधिकार सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.पुतळा ३११६/प्र.क्र.३०८/२९, दिनांक २/५/२०१७ अन्वये मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील पुतळा समितीस देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कौशल्य विकास व उद्योग विभागात शिल्प निदेशकांची रिक्त पदे भरणेबाबत व तासिका शिल्पनिदेशकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(३३) ८८५६६ (०४-०९-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत मोठ्या प्रमाणावर कारखान्यांना उपयुक्त असणारे कुशल मनुष्यबळ कौशल्य विकास अभ्यासक्रमातून शिकवले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कौशल्य विकास व उद्योग विभागात शिल्पनिदेशकांची जवळपास ३५ टक्के पदे रिक्त असून सदर रिक्त जागांवर तासिक तत्वावर शिक्षक नेमले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तासिक तत्वाचे शिल्पदेशकांना फक्त ७२ रुपये प्रति तास सैध्दांतिक पद्धती (थेयरी) व ३६ रुपये प्रति तास प्रॅक्टीकल (प्रात्याक्षक) अभ्यासक्रम शिकवण्यासाठी दिले जातात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तुटपुंजे मानधन असल्यामुळे वेळेवर शिल्पनिदेशक उपलब्ध होत नसल्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण होण्यास अडचणी निर्माण होतात, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर विभागातील रिक्त पदे भरण्यास तसेच तासिका शिल्पनिदेशकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत कार्यरत शासकीय संस्था / कार्यालयातील नियमित वेतनश्रेणीतील शिल्प निदेशकांच्या एकूण ५१९१ मंजूर पदांपैकी ३९३९ पदे भरलेली असून १२५२ पदे रिक्त आहेत. तथापि, तातडीच्या प्रसंगी व भरतीच्या कार्यवाहीस लागणा-या कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रशिक्षणात कोणताही खंड पडू नये व प्रशिक्षण व्यवस्थित सुरु रहावे यासाठी नियमित निदेशकांचे पद भरण्यात येईपर्यंत पर्यायी व्यवस्था म्हणून स्थानिक पातळीवर प्राचार्यांमार्फत तासिका तत्वावर निदेशकांची नेमणूक करण्यांत येते.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नाही, हे खरे नाही.

(५) व (६) सन २०१४ मध्ये नियमित वेतनश्रेणीतील शिक्षक व शिक्षकेत्तर ७०२ रिक्त पदे व ठोक वेतनावरील ४३० रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात दिली होती. त्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु होती. तथापि, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ०६.०५.२०१६ रोजीच्या आदेशान्वये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने प्रसिध्द केलेली पदभरतीची जाहिरात रद्द केली होती. सदर आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र ११०५५/२०१६ अन्वये शासनाच्या वतीने अपील दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक २३.११.२०१६ रोजीच्या अंतरिम आदेशानुसार, शिल्प निदेशक पदे वगळून उर्वरित पदांची भरती प्रक्रिया करण्यास संमती दिली. त्यानुसार शिल्प निदेशक पदे वगळून उर्वरित ४२२ पदांची भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्याची प्रक्रिया प्रादेशिक कार्यालयाच्या स्तरावर सुरु आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सैध्दांतिक व प्रात्यक्षिक तासिका घेण्यासाठी तासिका तत्वावरील निदेशकांच्या मानधनात प्रती तासिका दरात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

---

### उल्हासनगरमध्ये (जि.ठाणे) गँगस्टर सुरेश पुजारीची टोळी पुन्हा सक्रिय असल्याबाबत

**(३४) ८८७४४ (०४-०९-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर - ५ (जि.ठाणे) परिसरातील दुध नाक्या जवळील गजबजलेल्या ठिकाणी मुकेश वाईन्स या दुकानावर अज्ञान हल्लेखोरांनी गोळीबार केल्याची घटना दिनांक २५ मे २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुकानमालकाने परिसरातील हिललाईन पोलीस स्टेशनमध्ये माहिती दिल्याने सुरेश पुजारी टोळी उल्हासनगरात पुन्हा सक्रीय झाल्याचे माहे एप्रिल-मे २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार सदर हल्लेखोराचा तपास करुन त्यांचेवर कारवाई करण्याबाबत व कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१७) :** (१) सदर घटना दि. २७.४.२०१७ रोजी घडली आहे.
(२) सदर घटनेनंतर सुरेश पुजारी टोळी कडून उल्हासनगर परिसरात इतर कोणताही गुन्हा घडला नाही.
(३) होय,
(४) सदर घटनेबाबत हिललाईन पोलीस स्टेशन गु.र.नं.१०६/२०१७ भा.दं.वि. कलम ३०७, ३८७, ३४, १२०(ब), ४५२ सह भा.ह.का. ३, २५, २७(२) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी ४ आरोपींना अटक करून त्यांच्याविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून खटला न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाण्यातील सुमारे ६९ नागरिकांकडून पंचतारांकित हॉटेलच्या नावाने खोटे करारनामे करून आर्थिक फसवणुक केल्याबाबत**

**(३५) ८९३९४ (०४-०९-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणेतील सुमारे ६९ नागरिकांकडून पंचतारांकित हॉटेलच्या नावाने खोटे करारनामे करुन महिन्याभरासाठी दीड लाख रुपये भाडे देण्याचे प्रलोभन दाखवून त्यांच्याकडून या गाडयांची रक्कम ताब्यात घेवून पसार झाल्याची बाब दिनांक १६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर फसवणूक करणा-या आरोपींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-५ अंतर्गत चितळसर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ८५/२०१७, भा. दं. वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७२,

४०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमुद गुन्ह्यातील ३ आरोपीविरुध्द मा.न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील २७ ग्रामपंचायतीचे विभाजन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३६) ८९६४६ (१८-०८-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील २७ ग्रामपंचायतीचे विभाजन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन वर्षात २७ ग्रामपंचायतीमधील केवळ एकाच ग्रामपंचायतीचे विभाजन करण्यात आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडे प्रलंबित असलेल्या ग्रामपंचायत विभाजन प्रस्तावावर तातडीने निर्णय घेऊन ग्रामपंचायतीचा कारभार सुरळीत व्हावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) शासन निर्णय दि. १२ फेब्रुवारी, २००४ व दि. ४ मार्च, २०१४ मधील सूचना विचारात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्याकडून विभागीय आयुक्त यांच्या मार्फत राज्य शासनास प्राप्त परिपूर्ण प्रस्तावाच्या अनुषंगाने ग्रामपंचायत स्थापनेकरिता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ च्या खंड (छ) व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ४ नुसार गाव जाहीर करण्यात येते.

दि. ०१ जानेवारी, २०१४ पासून ३१ ऑक्टोबर २०१७ पर्यंत अहमदनगर जिल्हयातील ग्रामपंचायत विभाजन/ स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचे एकूण ८ प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडून विभागीय आयुक्त यांचे मार्फत राज्य शासनास सादर करण्यात आले होते. सदरील ८ प्रस्तावापैकी ता. कर्जत येथील कोरेगाव ग्रामपंचायतीचे विभाजन करुन कोरेगाव व बजरंगवाडी ही स्वतंत्र गावे असल्याबाबतचे राजपत्र दि.१७.१.२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आले असून सदरचे राजपत्र सर्व संबंधितांना दि. ३१.१.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे.

एरंडगाव भागवत ता. शेवगाव विभाजन प्रस्ताव व कोपरगाव ग्रामीण ता. कोपरगाव त्रिशंकू भागासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही प्रस्तावित असून अन्य ५ प्रस्ताव हे ग्रामपंचायतीची मुदत संपण्याचा कालावधी ६ महिन्यांपेक्षा कमी शिल्लक असल्याने राज्य निवडणूक आयोग यांचे दि. २७/०१/२००५ च्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त, नाशिक यांना परत पाठविण्यात आले आहेत.

---

**नागपूर शहरातील कामगार कल्याण केंद्र येथील स्विमींग पूल मधील टॉइल्स दूरूस्तीबाबत**

**(३७) ८९९२४ (०४-०९-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील कामगार कल्याण केंद्र येथील स्विमींग पूल मधील टॉइल्स जागोजागी उखडून आल्याने स्विमींग पूल मध्ये येणा-या नागरीकांच्या पायांना दुखापती होत असल्याचे दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर स्विंमीग पूल येथील टॉइल्स दूरूस्तीचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१७) :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर जलतरण तलावाची दुरुस्ती मंडळाने माहे जून २०१७ मध्ये करुन घेतली आहे.

---

**पुणे विभागातील ७२ निवृत्त गट निर्देशकांना वेतन निश्चित करून व्याजासहीत फरकाची पूर्ण रक्कम मिळण्याबाबत**

**(३८) ९१७०५ (०४-०९-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय टी आय) मधून सन २००० मध्ये निवृत्त झालेल्या गटनिर्देशकांना सन १९९६-९७ मध्ये गटनिर्देशक पदावर बढती देऊन वेतन निश्चित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गटनिर्देशकांकडून तीन वर्षानंतर वेतनवाढ व बढती रद्द करून अधिकची रक्कम वसूल करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसुली करण्याच्या निर्णयाच्या विरोधात कर्मचा-यांनी महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण (मॅट) व न्यायालयात दाद मागितली, असता सदर निवृत्त कर्मचाऱ्यांना वेतन निश्चित करून फरकाची रक्कम व्याजासह ४ महिन्याच्या कालावधीत कर्मचाऱ्यांना द्यावी असे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे विभागातील ७२ गटनिर्देशकांव्यतिरिक्त राज्यातील इतर गटनिर्देशकांना वेतन निश्चित करून व्याजासहीत फरकाची पूर्ण रक्कम मिळाली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाच्या पुण्यातील सहसंचालकांनी दिनांक ५ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास नवे आदेश काढत पूर्वीप्रमाणे एक वेतनवाढ कमी करून वसुलीचे आदेश काढून न्यायालयाच्या निर्णयाची अवमानना केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास,पुणे विभागातील ७२ गटनिर्देशकांना वेतन निश्चित करून व्याजासहीत फरकाची पूर्ण रक्कम मिळण्याबाबत शासनाच्या वतीने काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय दि.८/३/१९९९ अन्वये पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे दि.१/१/१९८६ पासून वरिष्ठ व निवड श्रेणी संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली आहे. त्यावेळी वेतननिश्चिती करतांना गटनिदेशक पदावर पदोन्नतीच्या वेळेस एक वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती करण्यात आलेली होती.

(२) बढती रद्द करण्यात आलेली नाही. परंतू काही गटनिदेशकांच्या बाबतीत देण्यात आलेली एक वेतनवाढ काढून घेण्यात आलेली होती.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) नाही, हे खरे नाही.

(६) व (७) शासनाने दिनांक १७.०८.२०१३ च्या पत्रान्वये मा. न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार शिल्प निदेशक पदावर वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन घेत असलेल्या कर्मचा-यांना गट निदेशक पदावर पदोन्नती दिल्यानंतर शिल्प निदेशक पदी घेत असलेल्या वेतनावर एक काल्पनिक वेतनवाढ देऊन गटनिदेशक पदाच्या ( पाचव्या वेतन आयोगानुसार रु ६५००-१०५०० ) या मूळ वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यात यावी. तसेच, शिल्प निदेशक पदावर निवडश्रेणीत वेतन घेणा-या कर्मचा-यांची गट निदेशक पदावर पदोन्नती झाल्यानंतर शिल्प निदेशक पदावर ते घेत असलेल्या वेतनावर एक काल्पनिक वेतनवाढ देऊन गट निदेशक पदाची वेतनश्रेणी सुधारित झालेली असल्यामुळे सदर वेतनश्रेणी अनुज्ञेय होत असलेल्या कर्मचा-यांची वेतननिश्चिती त्या वेतन श्रेणीत करणे अपेक्षित आहे. असे संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविले आहे. त्यानुसार पुणे विभागातील एकूण १६३ गटनिदेशकांपैकी १४३ गटनिदेशकांची वेतननिश्चिती करुन फरकाची रक्कम देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. उर्वरित २२ गटनिदेशकांबाबत संस्थास्तरावर कार्यवाही चालु आहे.

---

## राज्य शासनांतर्गत आंतरजिल्हा वा आंतर विभागीय बदली होवून नवीन विभागात रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सेवकाल पदोन्नतीसाठी गणण्याबाबत

**(३९) ९१८३२ (२४-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनांतर्गत आंतरजिल्हा वा आंतर विभागीय बदली होवून नवीन विभागात रुजू होणा-या कर्मचा-याचा सेवकाल पदोन्नतीसाठी गणला जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १७ जानेवारी, २००८ रोजी सदर कर्मचा-यांचा सेवेचा अनुभव व सेवाकाळ पदोन्नतीसाठी गणण्यात यावा असे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक असतानाही अद्यापपर्यंत शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४), (५) व (६) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. १७/०१/२००८ रोजी दिलेल्या आदेशामध्ये आंतरजिल्हा व आंतरविभागीय बदली झाल्यानंतर पूर्वीच्या विभागात केलेल्या कामाचा अनुभव पदोन्नती किंवा उच्च वेतनश्रेणी यांसारख्या अन्य फायद्यांसाठी विचारात घेण्याबाबत आदेश दिलेले असले तरी जुन्या विभागातील / कार्यालयातील सेवाज्येष्ठता, नवीन विभागातील / कार्यालयातील पदावर कायम राहण्याबाबत निर्देश दिलेले नाहीत. पदोन्नतीसाठी सेवाज्येष्ठता हा महत्वाचा निकष विचारात घेतला जातो. सेवाज्येष्ठतेनुसार संबंधित कर्मचारी विचारक्षेत्रात येत असल्यास व तो पदोन्नतीच्या निकषानुसार पात्र ठरत असल्यास त्याला पदोन्नती दिली जाते. त्यामुळे जुन्या विभागातून / कार्यालयातून नवीन विभागात / कार्यालयात रुजू झाल्यानंतर सेवाज्येष्ठता संपुष्टात येत असल्याची बाब विचारात घेता संबंधित कर्मचाऱ्याचा सेवाकाळ ज्येष्ठतेसाठी विचारात घेतला जात नाही. त्यामुळे जेव्हा संबंधित कर्मचारी नवीन ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी पात्र ठरतो, त्यावेळी त्याला पदोन्नती दिली जाते. मात्र मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१७.०१.२००८ च्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने, स्वविनंतीनुसार अथवा अन्य कारणास्तव बदली झाल्यामुळे ज्येष्ठता गमावलेल्या कर्मचाऱ्यांची बदलीपूर्वीची नियमित सेवा, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसाठी ग्राह्य धरण्याचा लाभ, दि.०१.१०.१९९४ पासून अंमलात आलेल्या कालबध्द पदोन्नती योजनेसाठी देखील देण्यात यावा, असे आदेश दि.०१.११.२००८ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यात आले असल्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

---

**नवी मुंबईतील घणसोली सेक्टर पांच येथील हावरे चौकात रिक्षा चालकांनी एनएमएमटीच्या फय्याज पठाण या बसचालकाला जबर मारहाण केल्याबाबत**

**(४०) ९२१०० (०४-०९-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील घणसोली सेक्टर पांच येथील हावरे चौकात दिनांक ९ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास सायंकाळी तीन हात उद्म रिक्षा चालकांनी एनएमएमटीच्या फय्याज पठाण या बसचालकाला लाथाबुक्यांनी व सायकल डोक्यात घालून जबर मारहाण केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ठाणे जिल्हयातील कल्याण येथे एका रिक्षाचालकाने व त्यांच्या साथीदारांनी नवी मुंबई पालिका परिवहन सेवेच्या बसचालक, वाहकाला जबर मारहाण केली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अनेक शहरात शासनाच्या परिवहन सेवेच्या बसचालकास, वाहकास रिक्षाचालकांकडून मारहाणीच्या घटना सातत्याने घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने सदर रिक्षाचालक व त्यांच्या साथीदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) नाही.

(४) होय.

(५) नवी मुंबईतील घणसोली भागात एनएमएमटीच्या बस चालकास मारहाण केल्याप्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाणे येथे गुर.नं.१८७/२०१७, भा.द.वि. कलम ३५३, ३२५, ३२४, ३४१, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी तीन आरोपी निष्पन्न झाले असून या तीन आरोपींना अटक केली असून सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत.

ठाणे आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात बसचालकास मारहाणीच्या तीन घटना घडल्या असून त्याबाबत खालीलप्रमाणे गुन्हे दाखल केले आहेत.

i) मानपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २४२/२०१७, भा.द.वि. कलम ३४३, ३२३, ५०४, ३४ सह सार्वजनिक मालमत्तेस हानी प्रतिबंध अधिनियम कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी दोन आरोपींना अटक केली असून सध्या ते जामीनावर मुक्त आहेत. गुन्हयांचा तपास सुरु आहे.

ii) ठाणे नगर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३५/२०१७, भा.द.वि. कलम ३५३, ३३२, ५०४, ३४ प्रमाण गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी एका आरोपीस अटक केली असून सध्या तो जामीनावर मुक्त आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

iii) चितळसर पोलीस ठाण्यात गु.र.नं. २६/२०१७ भा.द.वि. कलम ३५३, ५०४, ३४१ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी एका आरोपीस अटक केली असून सध्या तो जामीनावर मुक्त आहे. सदर गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल केल असून खटला न्यायप्रविष्ट आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कन्नमवार नगर (विक्रोळी पूर्व, मुंबई) येथील कामगार कल्याण मंडळाच्या जागेवर जलतरण तलावाचे काम सुरू करणेबाबत**

**(४१) ९२२२६ (०४-०९-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नमवार नगर (विक्रोळी पूर्व, मुंबई) येथील कामगार कल्याण मंडळाच्या जागेवर जलतरण तलाव मंजुर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजुर करण्यात आलेल्या जलतरण तलावाच्या कामाचे निविदा काढून एका वर्षाच्या आत जलतरण तलावाचे काम सुरू करण्याचे मा. कामगार मंत्री यांनी संबंधितास निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जलतरण तलावाच्या कामाच्या निविदा काढून जलतरण तलावाचे काम सुरू करण्याबाबत शसनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) जलतरण तलावाच्या प्रकल्पाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

---

**चाळीसगाव शहरात (जि. जळगाव) नियमांचे उल्लंघन करणा-या डीजे व्यावसायिकांवर कारवाई करण्यास होत असलेला विलंब**

**(४२) ९२४६२ (०४-०९-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव शहरात (जि.जळगाव) डीजेचा कर्णकर्कश आवाज दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे रुग्ण व ज्येष्ठ नागरिकांना अधिक त्रास होत असून नियमांचे उल्लंघन करणा-या डीजे व्यावसायिकांवरील कारवाईबाबत दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंगल कार्यालयात डीजे रात्री उशीरापर्यंत वाजत असून न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणा-या अश्या डीजे व्यावसायिकांवर पोलीस प्रशासन कारवाई का करीत नाहीत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार नियमांचे उल्लंघन करणा-या डीजे व्यावसायिकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दहिवडी (जि.सातारा) येथे अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(४३) ९२६६४ (०४-०९-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिवडी (जि.सातारा) येथे अवैध धंदे सुरु असल्याने येथील नागरीक त्रस्त झाले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील अवैध धंद्यावर कारवाई होऊनही ते पुन्हा सुरु करीत असल्याने याबाबत शासनस्तरावरुन कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१७) :** (१) दहिवडी ता.माण जि.सातारा येथे अवैध धंदे सुरु असल्याबाबत माहे मे, २०१७ मध्ये पोलीस स्टेशन, दहिवडी येथे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) माहे मे, २०१७ व त्यानंतर मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन पोलीसांनी अवैध धंदे करणाऱ्यांवर छापे टाकुन दहिवडी पोलीस स्टेशन येथे दारुबंदी कायद्याखाली ०२ गुन्हे दाखल करुन त्यामध्ये एकूण १,४७,५७२/ रुपयांचा मुद्देमालासह ०२ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

तसेच, जुगार कायद्याखाली ०४ गुन्हे दाखल करण्यात आलेले असुन त्यामध्ये एकूण ३०३०/- रुपये रोख व जुगार साहित्य अशा मुद्देमालासह ०४ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. उक्त सर्व गुन्हे उघडकीस आले असुन त्यामधील सर्व अटक आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच, दहिवडी येथे अवैध धंदे करणाऱ्यावर माहिती प्राप्त होताच वेळोवेळी छापे टाकुन योग्य ती कायदेशीर व प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**पोलीस भरतीसाठी सन २०११ पासून लागू करण्यात आलेला आंतरजिल्हा बदली बंदचा नियम शिथिल करण्याबाबत**

**(४४) ९२९३२ (०४-०९-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस भरतीसाठी सन २०११ पासून लागू करण्यात आलेला आंतरजिल्हा बदली बंदचा नियम शिथिल करण्यात यावा वा त्यात सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी राज्यातील हजारो पोलीस कर्मचाऱ्यांची असून याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने दिनांक २८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास, अप्पर गृह सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पत्रव्यवहार करून सदरहू अट शिथिल करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पत्राच्या अनुषंगाने शासनाने सदरहू अट शिथिल करण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) दि.१९ सप्टेंबर, २०१७ च्या आदेशान्वये महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ११ पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात आला आहे :- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ (२) (अ), उपखंड (अ) च्या अधिनतेने पोलीस शिपाई पदावर नियुक्ती केलेला कर्मचारी, त्याच्या विनंतीनुसार, त्याच्या नियुक्तीच्या पोलीस घटकातून तो इतर पोलीस घटकात बदलीसाठी, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी बदलीसाठी पात्रता, बदली प्रक्रिया, सक्षम प्राधिकारी, सेवाज्येष्ठता व इतर अटी संदर्भात राज्य शासनाच्या मान्यतेने निर्गमित केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून पात्र राहील.

---

**नांदेडला मराठवाड्यातील दुसरे पोलीस आयुक्तालय सुरु करण्याबाबत**

**(४५) ९३३६६ (०४-०९-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड (जि.नांदेड) शहरात वाढत असलेली लोकसंख्या, गुन्हेगारीचे वाढते प्रमाण व जिल्ह्याचा विस्तार लक्षात घेता पोलिस यंत्रणेवर ताण पडत असल्यामुळे नांदेडला मराठवाड्यातील दुसरे पोलीस आयुक्तालय सुरु करण्यात यावे अशी मागणी येथील मा.खासदार व स्थानिक नागरीक यांनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे आहे,

(२) असल्यास, नांदेडला पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) नांदेड शहराकरीता पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याबाबतच्या सदर निवेदनाच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यात स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करण्याबाबत**

**(४६) ९३४८६ (०४-०९-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करण्याबाबतचा प्रस्ताव मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, कोकण भवन, नवी मुंबई यांच्या कार्यालयात दिनांक १ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१७) :** (१) व (२) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई यांनी दिनांक १ मार्च, २०१७ च्या पत्रान्वये मिरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबत सादर केलेला प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक २७.०६.२०१७ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई, अंधेरी येथील कामगार कल्याण भवनात स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विकास निधीतून चांगल्या दर्जाच्या सोई सुविधा पुरविण्याबाबत**

**(४७) ९३९७२ (०४-०९-२०१७). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील कामगार कल्याण भवन, अंधेरी या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या इमारतीमधील अभ्यासिका, वाचनालय, व्यायामशाळा, बगिचा, खेळाचे मैदान यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभ्यासिका, वाचनालयाचे अत्याधुनिकरण, जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, लहान मुलांसाठी उद्यानाचे सुशोभिकरण व्यायामशाळेमध्ये अद्यावत साहित्य पुरविणे इत्यादी कामे स्थानिक लोकप्रतिनिधींनी आपल्या विकास निधीतून करण्याकरीता कल्याण आयुक्त यांना वारंवार कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण आयुक्त यांनी शासनास वेळोवेळी सर्व लोकप्रतिनिधींचे प्राप्त झालेले प्रस्ताव मान्यतेस पाठविले असता शासनाने सदर प्रस्तावास मान्यता देता येणार नाही असे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कामगार कल्याण भवनात नागरिकांना चांगल्या दर्जाच्या सोई सुविधा पुरविण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींचा विकास निधी वापरणार नसल्यास शासन स्वतः कोणती कार्यवाही करणार वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१७) :** (१) हे खरे नाही. मात्र देखभाल योग्य प्रकारे होत नाही हे खरे आहे.
(२) होय.
(३) नियोजन विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार मंडळास शासनाकडून कळविण्यात आले आहे.
(४) व (५) सदर इमारतीची देखभाल योग्य प्रकारे ठेवण्यासाठी कार्यवाही महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ स्तरावरुन होणे अपेक्षित आहे.

---

**भंडारा जिल्ह्यातील एका मुलीस पैशाच्या हव्यासापोटी सहा वेळा विक्री करण्यात आल्याबाबत**

**(४८) ९४१०० (०४-०९-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गराडा (ता.लाखनी जि.भंडारा) येथील एका महिलेने आपल्याच मुलीला पैशाच्या हव्यासापोटी एकुण सहा वेळा विक्री करून विविध ठिकाणी तिचा विवाह लावून दिल्याची दुर्देवी घटना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तिच्याच पतीने स्वत:च्या अल्पवयीन मुलीवर सतत सहा महिने लैंगिक अत्याचार केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गरीब व असाह्यतेचा फायदा घेत मुलीची विक्री करून विवाह लावून देणारी टोळी विदर्भात अनेक वर्षापासून सक्रिय आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) होय,हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. पोलीस तपासात निष्पन्न झालेले नाही.
(४) पिडीत मुलीने दिलेल्या तक्रारीवरून लाखनी पो स्टे येथे ६ आरोपी विरूध्द अप क्र १४४/१७, कलम ३१२,३६६,३७०,३७६,४९३,४९६,३४ भा द वि सह कलम ९,१०,११ बालविवाह

प्रतिबंधक अधि २००६, RW ४,६ बा.लै अत्या. संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा दाखल केलेला असून आरोपी विरूध्द दोषारोप पत्र दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच अपराध क्र. १४८/१७, आरोपीविरूध्द कलम ३७६,३६६,३७०,१०९,५०६ भा.द.वि. सह कलम ८, १० बाल लैंगिक अत्याचार संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा दाखल असून आरोपी विरध्द दोषारोपपत्र दाखल केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरळी (मुंबई) येथील स्मशानभूमीतील स्वर्गीय माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या पुतळ्यास मान्यता देवून शासनाच्या अधिपत्याखाली अधिकृत करण्याबाबत**

**(४९) ९४८३१ (०४-०९-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) येथील स्मशानभूमीतील स्वर्गीय माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या पुतळ्यास मान्यता देवून शासनाच्या अधिपत्याखाली अधिकृत करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून सातत्याने शासनाकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१७) :** (१) होय.

(२) पुनर्रचित विकास आराखडा, १९९१ अनुसार लोअर परळ विभागातील नगर भूमापन क्र. ४७ (भाग) ही जमीन "स्मशानभूमी" या सार्वजनिक उध्दीष्टासाठी नामनिर्देशित आहे. सदर जागेत विद्युत दाहिनी, लाकडाचा वापर होत असलेली दाहिनी, लहान मुलांसाठी दफन भूमी अशी अंत्यविधीची जागा आहे. पुतळा असलेली जागा ही अंत्यसंस्कारासाठी येणा-या नातेवाईकांच्या वाहनांच्या /गाड्यांच्या पार्कींगसाठी वापरात आहे. या ठिकाणी पार्कींगसाठी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे सदर जागा स्मारकासाठी वापरल्यास रहदारी व वाहतूकीस अडथळा निर्माण होईल. सदर जागा केवळ अंत्यविधीशी निगडित विधींसाठी राखीव असून त्या ठिकाणी स्मारक उभारणे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणात बसत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सातिवली (जि. पालघर) येथील जमीनी बनावट कागदपत्रे व मूळ मालकांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून विक्री करणाऱ्या भूमाफियांवर कारवाई करण्याबाबत**

**(५०) ९४९१८ (०४-०९-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सातिवली (जि.पालघर) येथील सर्व्हे क्र. २, सर्व्हे क्र. १२ (हिस्सा क्र. २), सर्व्हे क्र. ६६, तसेच सर्व्हे क्र. ६८ या मिळकती भू-माफियांनी खोटे दस्तऐवज बनवून, मूळ मालकांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून, खोट्या मुद्रांक पेपरच्या सहाय्याने, नोटरीची खोटी स्वाक्षरी करुन अन्य व्यक्तींना विक्री केल्या प्रकरणी फसवणूक झालेल्या जमिनीच्या मुळ मालकांनी लेखी निवेदनाद्वारे मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), महाराष्ट्र राज्य यांचे लक्ष वेधले असता त्यांनी दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हा पोलीस अधीक्षक, पालघर यांना सदर प्रकरणी "तपासून प्राधान्याने आवश्यक कार्यवाही" करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू चौकशीत काय आढळून आले आहे आणि तदनुसार सदर प्रकरणातील दोषी भू-माफियांवर व संबधित अधिकाऱ्यांवर शासनाकडून अद्यापर्यंत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१७) :** (१), होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, सदर प्रकरणी प्राप्त तक्रार अर्जातील वादग्रस्त जमीनीच्या अनुषंगाने मा. दिवाणी न्यायालयात परस्पर विरोधी दावे दाखल आहेत. यातील गैरअर्जदार यांच्याकडून मुळ साठेकरार अद्याप प्राप्त झालेला नाही. सदर मुळ साठेकरार प्राप्त करुन घेण्याच्या मुद्यावर अर्जाची चौकशी प्रलंबित आहे. सदर बाबीची पूर्तता करुन तक्रार अर्जावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** | **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** | **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.